मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# उद्योगनगरीत महापालिकेच्या कामाची गती मंदावली

## महापालिकेत गेल्या काही वर्षांपासून तब्बल 4,648 रिक्त पदे : वारंवार मागणी करूनही ही पदे अद्याप भरलेली नाहीत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेल्या काही वर्षांपासून तब्बल ४,६४८ रिक्त पदे आहेत. वारंवार मागणी करूनही ही पदे अद्याप भरलेली नाहीत. या जागा अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने त्याचा महापालिकेच्या दैनंदिन कामावर विपरित परिणाम होत आहे.

शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून सध्यस्थितीत ३० लाखांच्या घरात गेली आहे. या लोकसंख्येला नागरी सुविधा पुरविताना महापालिकेची दमछाक होत आहे. उपलब्ध मनुष्यबळ कमी असल्याने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढत आहे. महापालिकेच्या नवीन आकृतीबंधानुसार एकूण ११ हजार ५१५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ ६ हजार ८६७ पदांवर अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत.



दर महिन्यास किमान २० ते २५ अधिकारी आणि कर्मचारी निवृत्त होत आहेत. त्या जागेवर नोकरी भरती होत नसल्याने अनेक महत्वाची पदे रिक्त आहेत. आतापर्यंत तब्बल ४ हजार ६४८ जागा रिक्त आहेत. त्यामुळे एकाच अधिकाऱ्यांकडे अनेक विभागांची जबाबदारी टाकली जात आहे. परिणामी, नियमित दैनंदिन कामकाज आणि त्यात अतिरिक्त जबाबदारी, यामुळे महापालिकेच्या कामकाजाचा खोळंबा होत आहे. या सर्व विलंबामुळे करदात्या नागरिकांना वेळेत नागरी सुविधा उपलब्ध होत नाहीत. कामाचा दर्जा ढासळत आहे. विकासकामे रखडण्याचे प्रकार वाढले आहेत.

महापालिकेच्या सुरुवातीपासून कार्यरत असलेले अनेक अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत, तसेच, काही अधिकारी निवृत्तीच्या टप्प्यात आहेत. २००० पासून महापालिकेतून वर्ग एक ते वर्ग चारमधील तब्बल ६ हजार १६३ अधिकारी सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, राजीनामा, निधन यामुळे शासनसेवेतून गेले आहेत.

> महापालिकेकडून ३६० पदांची नोकरभरती काही महिन्यापूर्वीच पूर्ण झाली. लिपिक आणि अभियंता पदावर रूजू झालेल्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. अग्निशमन विभागाची विविध पदे भरली जात आहेत.
>
> - विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग

नगरसचिव, उपनगरसचिवपद पाच महिन्यांपासून रिक्त महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव उल्हास जगताप हे ३० जून २०२४ ला सेवानिवृत्त झाले. त्यापूर्वी किमान तीन महिने अगोदर नगरसचिव पद भरणे आवश्यक होते. नव्या नगरसचिवाला ते कामकाज समजून घेता आले असते. मात्र, तसे न झाल्याने महापालिकेत सध्या नगरसचिव तसेच, उपनगरसचिव नाहीत. अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्याकडे नगरसचिव पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. वरिष्ठ पदावरील अधिकारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्या जागी पात्र अधिकाऱ्यांची किमान एक ते दोन महिने अगोदर नियुक्ती होणे आवश्यक आहे. त्या अधिकाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. त्या पदावर अधिकारी उपलब्ध नसल्यासे जाहिरात देऊन त्या जागा तातडीने भरणे गरजेचे आहे. मात्र, त्याबाबत तातडीने हालचाल होत नसल्याचे दिसून येत आहे.

# पिंपरी आरटीओत कर्मचारीच येतात हेल्मेटविना

## प्रशासनाकडून पुन्हा सूचना देण्याची वेळ, 1 डिसेंबरपासून कडक कार्यवाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील शासकीय कार्यालय प्रमाणेच पिंपरी- चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) दुचाकीने येणाऱ्या नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांना आता 'हेल्मेट' परिधान करण्याबाबत सक्ती आहे. मात्र, त्याला कोणी जुमानत नसल्याने आरटीओ प्रशासनाला पुन्हा सूचना देण्याची वेळ आली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील इतर सरकारी कार्यालयाच्या अगोदर आरटीओमध्येच हेल्मेट सक्तीबाबत अनास्था असल्याचे दिसून येते.



मागील महिन्यांत विभागीय आयुक्तांनी शहरातील सर्वच शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी 'हेल्मेट' सक्तीचा निर्णय घेतला होता. त्यावेळी पुणे आरटीओ कार्यालयातील तीन ते चार कर्मचाऱ्यांना 'हेल्मेट' न परिधान केल्याने मेमो देण्यात आला होता. आता हा निर्णय कर्मचाऱ्यांसह नागरिकांनादेखील अनिवार्य करण्यात आला आहे. तीच कारवाई पिंपरी चिंचवड शहरात मध्ये करावी लागणार आहे. त्यामुळे आता पिंपरी आरटीओ यावरती कोणती अंमलबजावणी करते, याकडे लक्ष लागले आहे

वाहन परवाना आणि इतर कामांसाठी आरटीओ कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची संख्या जास्त आहे. रस्ता सुरक्षितता आणि वाहतुकीसाठी काम करणाऱ्या आरटीओ विभागाच्या कार्यालयातच येताना अनेकजण विना हेल्मेट येतात. त्यामुळे आरटीओ प्रशासनाने 'हेल्मेट' सक्तीचा निर्णय घेतला आहे. निवडणुकीच्या कामात सर्वच शासकीय यंत्रणा व्यस्त असल्याने कारवाई होत नव्हती. मात्र आता प्रभावीपणे काम केले जाईल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले.. दरम्यान, येत्या दोन दिवसात याबाबत कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. पुणे शहरांमध्ये आरटीओच्या वतीने हेल्मेट तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

# पीएमआरडीएकडून हिंजवडीतील अवाढव्य होर्डिंगवर कारवाई

## अनअधिकृत होर्डिंगवर कारवाईने वेग घेतला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुका कामकाज पार पडल्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) अनअधिकृत होर्डिंगवर कारवाईने वेग घेतला आहे. हिंजवडी (ता. मुळशी) येथील होर्डिंग काढून पीएमआरडीएच्या पथकाकडून जप्त करण्यात आले आहे. दरम्यान, या परिसरात आणखी कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



निवडणुकीच्या कामकाजामुळे या विभागातील अधिकाऱ्यांना विविध ठिकाणी इलेक्शन ड्यूटी असल्याने कामकाज रखडले होते. गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून कारवाई होत नसल्याने पीएआरडीएच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे होत आहेत. तसेच, बेकायदा होर्डिंगची संख्यादेखील वाढत असल्याचे दिग्दर्शनास आले आहे. दरम्यान, या कारवाईत साधारणपणे ४० बाय २० चौरस फुटाच्या अनधिकृत होर्डिंग क्रेन, गॅस कटर आणि मनुष्यबळाच्या साहाय्याने कारवाई करण्यात आली. त्यावेळी उपस्थित पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागातील अधिकाऱ्यांनी या ठिकाणी अनधिकृत बांधकाम करू नये, असे आवाहन केले. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग ॲक्शन मोडवर या मथळ्याखाली सीविक मिरर माध्यमातून वृत्त दिले होते. त्यात कारवाई अनधिकृत बांधकामाबरोबरच हॉटेल्स आणि होर्डिंग्जवरदेखील कारवाई करण्याचे नमूद केले होते. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या या पथकाने कारवाई सुरू केली आहे. त्याचप्रमाणे बांधकामावरदेखील कारवाई पुढील आठवड्यात होणार आहे.

# पुणे शहरातील पुतळ्यांबाबत महापालिकेने घेतला मोठा निर्णय !

## पुणे महापालिकेने शहरातील सर्व पुतळ्यांचे स्थापत्य लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यास सुरुवात केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याची घटना घडल्यानंतर त्याचे पडसाद केवळ महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात उमटले होते. सांस्कृतिक राजधानी अशी ओळख असलेल्या पुणे शहरात देखील अनेक जुने पुतळे उभारण्यात आलेले आहेत. या सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी पुणे महापालिकेने शहरातील सर्व पुतळ्यांचे स्थापत्य लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यास सुरुवात केली आहे.

यामध्ये काही पुतळ्यांमध्ये किरकोळ डागडुजी करावी लागणार असल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत समोर आले आहे. काही जुन्या पुतळ्यांच्या सुरक्षिततेसाठी 'अल्ट्रासॉनिक टोमोग्राफी टेस्ट' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन तपासणी करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे.

पुणे महापालिकेच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास पालिकेच्या भवन रचना विभागाने सुरुवात केली आहे. यामधून शहरातील विविध भागांमध्ये उभारण्यात आलेले पुतळे किती सुरक्षित आहेत, हे कळण्यास मदत होणार आहे. भवन रचना विभागाने काही पुतळ्यांची पाहणी देखील केली.




### शहरात 80 पुतळे

» महापालिका हद्दीत महापालिकेकडून अर्धाकृती आणि पूर्णाकृती असे ८० पुतळे उभारण्यात आले आहेत. त्या पुतळ्यांची सुरक्षा महत्त्वाची आहे. त्यामुळे या सर्व पुतळ्यांचे स्थापत्य लेखापरीक्षण करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात पालिकेने त्यांची तपासणी केली आहे. यापैकी २५ पुतळे हे ४० ते ४५ वर्षे जुने असल्याने ते वरून सुस्थितीत दिसत असले तरी आतमधून भक्कम आहे की नाहीत, हे तपासणे आवश्यक आहे. यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करून तपासणी केली जाणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले..

> शहरातील पुतळ्यांची पाहणी केली जात असून काही किरकोळ दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्यानुसार दुरुस्ती केली जात आहे. अनेक वर्षे जुन्या पुतळ्यांची सुरक्षितता तपासण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा वापर केला जाणार आहे. यासाठी जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.
> - युवराज देशमुख, मुख्य अभियंता, भवन रचना

मात्र अनेक पुतळे ४० ते ५० वर्षे जुने असल्याने ते वरुन सुस्थितीत असले तरी मधून भक्कम आहेत की नाहीत, हे तपासण्यासाठी 'अल्ट्रासॉनिक टोमोग्राफी टेस्ट' केली जाणार आहे, अशी माहिती भवन विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख यांनी दिली.

मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा नुकताच कोसळल्याच्या घटनेमुळे राज्यभरातील अशाच पुतळ्यांच्या सुरक्षेबाबत चिंता निर्माण झाली आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये या पुतळ्यांसाठी (पीसीएमसी स्ट्रक्चरल ऑडिट) जबाबदार आठ महापालिका क्षेत्रीय कार्यालये आहेत . एच वॉर्ड कार्यालय परिसरात सर्वाधिक पुतळे आहेत, ज्यामध्ये 15 आहेत, त्यानंतर अ वॉर्ड कार्यालय क्षेत्रात 11, जी वॉर्ड कार्यालय परिसरात पाच आहेत आणि उर्वरित आठ पुतळे इतर पाच वॉर्डांमध्ये पसरलेले आहेत. या पुतळ्यांच्या उभारणीसाठी महापालिकेने कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

जुळे शहरातील ऐतिहासिक व्यक्तींच्या पुतळ्यांच्या सुरक्षेबाबत चिंतित असलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व पुतळ्यांचे सर्वसमावेशक स्ट्रक्चरल ऑडिट (PCMC स्ट्रक्चरल ऑडिट) करण्याचा निर्णय घेतला आहे.

मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पडझड आणि मोशी येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला तडे गेल्याच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

# समाज कल्याण विभागाच्या भ्रष्टाचाराविरोधात अभाविपचे पोलखोल आंदोलन!

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने समाज कल्याण विभागाकडून झालेल्या वसतिगृह संदर्भातील भ्रष्टाचाराविरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले.



समाज कल्याण विभाग हा विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असायला हवा. परंतु, समाज कल्याण विभागातील एका कर्मचाऱ्याने वसतिगृह उपलब्ध करून देण्याच्या आमिषाच्या नावाखाली गरजू विद्यार्थ्यांकडून लाच घेतली व पैसे न दिल्यास वसतिगृह मिळणार नाही अशी वारंवार धमकी दिली. हा भ्रष्टाचाराचा प्रकार गेले अनेक महिने सुरू असून या विषयाची समाज कल्याण विभागाकडून कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही. या भ्रष्टाचाराविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून गुरुवारी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात आले.

या वेळी सहायुक्तांच्या कक्षा बाहेर बराच वेळ आंदोलन करूनही समाज कल्याण प्रशासन आणि सहआयुक्तांकडून आंदोलनाची कुठलीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे त्यांच्या कक्षाबाहेर निवेदन चिकटवण्यात आले. अभाविपने समाज कल्याणच्या प्रादेशिक आयुक्तांकडे निवेदन देऊन; अशा प्रकारचा कोणताही भ्रष्टाचार होणार नाही याची काळजी घ्यावी, गरजू विद्यार्थ्यांची वेळोवेळी सोय करून देण्यात यावी व भ्रष्ट कर्मचाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या.

यावेळी, "समाजकल्याण विभाग हा गोर गरीब विद्यार्थ्यांसाठी आहे. पण त्यांची जर आर्थिक पिळवणूक या भ्रष्टाचारी लोकांकडून होणार असेल तर समाज कल्याण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विद्यार्थी परिषद अजून मोठे आंदोलन करेल." असे मत पुणे महानगर मंत्री हर्षवर्धन हरपुडे यांनी व्यक्त केले.

# नॅशनल बुक ट्रस्टचे कार्यालय पुण्यात हलवणार

## चंद्रकांत पाटील यांनी दिली माहिती, महापालिकेच्या एका इमारतीची जागा देखील तत्काळ भाडेतत्त्वावर देण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

नॅशनल बुक ट्रस्टचे कार्यालय आता मुंबई येथून कायमस्वरूपी पुण्यात हलवण्यात येणार असून त्याकरिता महापालिकेच्या एका इमारतीची जागा देखील तत्काळ भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे. केवळ पुणे पुस्तक महोत्सवापुरते काम होणार नसून वर्षभर एनबीटीचे काम पुण्यामधून होणार असल्याची माहिती माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी दिली.



राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने १४ ते २२ डिसेंबरदरम्यान या वर्षीच्या पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवाच्या कार्यालयाचे उद्घाटन आणि मांडवाचे भूमिपूजन माजी मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महोत्सवाचे आयोजक राजेश पांडे, खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू पराग काळकर, एनबीटी संचालक युवराज मलिक, अध्यक्ष मिलिंद मराठे, उद्योजक कृष्णकुमार गोयल, डीक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, डीईएस अध्यक्ष प्रमोद रावत, उपाध्यक्ष अशोक पलांडे, ज्येष्ठ संपादक किरण ठाकूर, भाजप नेते माधव भंडारी, फर्ग्युसन महाविद्यालय प्राचार्य डॉ. विजय तडके उपस्थित होते.

पाटील म्हणाले की, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. त्याची माहिती सर्वसामान्य लोकांना समजण्यासाठी एक चित्रफीत तयार करून महोत्सवात दाखवण्यात यावी. मुलांसाठी चित्रपट महोत्सवासोबत एक पुस्तक आधारित नाटक बसवण्यात यावे. त्यामधून पुस्तकाची आवड मुलांमध्ये निर्माण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, पुणे विद्येचे माहेरघर आहे. पुस्तक महोत्सव यंदा मोठ्या प्रमाणात होईल. मुलांना चित्रपट महोत्सव सोबत मुलांसाठी कथाकथन आणि पुस्तक वाचन कट्टा निर्माण करण्यात यावा.

राजेश पांडे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, हा महोत्सव पुणेकरांचा आहे. त्याकरिता लोकसहभाग महत्त्वाचा आहे. यावर्षी चार विश्व विक्रम नोंदविण्यात येणार असून चीनचे विक्रम मोडीत निघणार आहेत. साडेसात लाख लोक महोत्सवाला यंदा भेट देतील अशी अपेक्षा आहे. पुस्तक महोत्सवामध्ये ५९८ स्टॉल असणार आहेत. साडेअकरा कोटी रुपयांची पुस्तक विक्री मागील वर्षी झाली होती. यंदा ती दुप्पट होईल. यंदा देखील एक लाख पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. युवराज मलिक यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय चाकने यांनी केले. प्रसेनजीत फडणवीस यांनी आभार मानले.

# उद्योगनगरीत जो तो किंगमेकर! म्हणतात, आमचाच नेता पॉवरफुल

## उद्योगनगरीतील पिंपरी, चिंचवड, भोसरी अन् मावळ या मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार निवडून आले. प्रत्येकाने आपापली ताकद पणाला लावली होती.

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरीतील पिंपरी, चिंचवड, भोसरी अन् मावळ या मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार निवडून आले. प्रत्येकाने आपापली ताकद पणाला लावली होती. मात्र निकाल लागल्यानंतर उद्योगनगरीत किंगमेकरना उत आला आहे. 'याला गाड, त्याला गाड'वृत्तीच्या लोकांनी महायुती आणि महाविकास आघाडीचा धर्म न पाळला नाही. आता निवडणूक झाल्यावर मात्र हेच लोक आता आम्हीच कसे किंगमेकर, हे उर बडवून सांगू लागले आहेत.

सोशल मीडियावर स्वतःला किंगमेकर म्हणवून घेत शहरातील अनेक नेत्यांची स्वतःची पाठ थोपटून घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे याबाबत सर्वच विजयी उमेदवारांनी मिश्किल प्रतिक्रिया देत 'मला सर्वांची साथ मिळाली,' असे सांगत यावर बोलणे टाळले आहे.

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात अनेक स्थानिक नेत्यांनी महायुतीच्या उमेदवारांना जाहीर विरोध दर्शवला होता. महायुती असल्याने उमेदवार बदलला तरच आपला विजय होईल, असे सांगणारे अनेकजण पुढे आले होते. पत्रकार परिषद घेत अजूनही उमेदवार बदलण्यास वाव आहे, असे सांगून इशारे देणारे आता मात्र स्वतःच्या बगलबच्चांना सांगून 'आम्हीच किंगमेकर ठरलो' अशा पोस्ट सोशल मीडियावर पोस्ट करू लागले आहेत.

भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांना महायुतीमधून थेट विरोध करताना कोणी दिसत नव्हते. भोसरीत पुरता विचार करायचा झाल्यास येथे 'आम्हीच किंगमेकर ठरलो...' अशी पोस्ट सोशल मीडियावर पोस्ट आली नसली तरी 'आम्ही सुरुवातीपासून महेश दादांबरोबर' अशा अनेक पोस्ट पाहायला मिळत आहेत.

पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे यांना महायुतीमधील शिवसेना आणि भाजपमधून तसेच स्वतःच्या राष्ट्रवादी काँग्रेस मधूनदेखील विरोध दर्शविला गेला. ज्या-ज्या नेत्यांनी अण्णा बनसोडे यांच्या उमेदवारीला विरोध केला, त्यांचे बगलबच्चे आता निकालानंतर मात्र आता 'आमचा नेता किंगमेकर' अशा पोस्ट फेसबुक, इंस्टाग्रामवर पोस्ट करू लागले आहेत.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांना तर स्वपक्ष भाजपमधून विरोध दर्शविला गेला होता. शंकर जगताप शहराध्यक्ष असतानादेखील त्यांच्या उमेदवारीला विरोध करणारे आता 'शंकरभाऊ आमदार झाले, गड राखला,' 'आम्ही कायम सोबत होतो...' अशा पोस्ट सोशल मीडियावर अपलोड करीत आहेत.

मावळमध्ये आमदार सुनील शेळके यांना तर सर्वच पक्षांनी विरोध दर्शविला होता. माजी राज्यमंत्री बाळा भेगडे आणि भाजपासह अन्य पक्षांनी एकत्र येत अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांना पाठिंबा जाहीर केला होता. पण आता निकाल लागल्यानंतर 'आम्ही आतून सुनीलअण्णा यांचेच काम केले,' असे सांगू लागले आहेत. एकंदरीत सोशल मीडियावर अचानक वाढलेले 'किंगमेकर' आणि आतून तसेच मनापासून काम करणारे कोण, हे सर्वच विजयी उमेदवारांना चागलेच माहित आहे. परंतु आता निकाल लागला असल्याने त्यानंतर थेट भाष्य करणे चारही आमदारांनी टाळले आहे.



### आमदार शंकर जगताप यांना राज्यात सर्वाधिक मते

» राज्यातील सर्वात मोठ्या मतदारसंघांपैकी एक असलेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघातून भाजपचे शंकर जगताप हे विजयी झाले आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघ २००९ मध्ये अस्तित्वात आल्यापासून जगताप कुटुंबीयांकडे हा मतदारसंघ राहिला आहे. सुरुवातीला दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे २००९ ते जानेवारी २०२३ पर्यंत आमदार होते. त्यांच्या निधनानंतर येथील पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप निवडून आल्या होत्या. त्यानंतर तीन दिवसांपूर्वी झालेल्या निवडणुकीत शंकर जगताप हे राज्यातील सर्वाधिक मते घेणारा आमदार म्हणून निवडून आले आहेत. त्यांनी या निवडणुकीत २,३५,३२३ मते मिळवली.

# 'काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता' एकसलग बीआरटी मार्ग प्रवाशांना होणार उपलब्ध

## शहरातील नागरिकांना जलद गतीने सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध व्हावी म्हणून महापालिकेने बीआरटी मार्ग तयार केले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड : शहरातील नागरिकांना जलद गतीने सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध व्हावी म्हणून महापालिकेने बीआरटी मार्ग तयार केले आहेत. महापालिकेने काळेवाडी फाटा ते चिखलीच्या देहू-आळंदी रस्ता या ११ किलोमीटर अंतराचा बीआरटीएस मार्ग विकसित केला. मात्र, ऑटो क्लस्टरसमोरील केवळ साडेतीन हजार चौरस मीटर जागा ताब्यात न आल्याने या मार्गाला अडथळा निर्माण झाला होता. अखेर १४ वर्षांनी त्या कंपनीची जागेवरील इमारती पाडण्यात येत आहे. त्यामुळे तीन महिन्यांत हा एक सलग मार्ग प्रवाशांना उपलब्ध होणार आहे.

काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता या बीआरटी मार्गावर ऑटो क्लस्टर व आयुक्त बंगल्यासमोरील युरोसिटी व इंड्रोलिक इंडस्ट्रियलची केवळ साडेतीन हजार चौरस मीटर जागा महापालिकेच्या ताब्यात आली नव्हती. त्या उद्योगांना महापालिकेने २००७ ला नोटीस दिली होती. नोटीस देऊन १४ वर्षे झाले तरी अद्याप बीआरटी मार्ग सुरू झालेला नाही. त्यामुळे पीएमपी बससह इतर वाहनांना १ किलोमीटर अंतराचा वळसा मारून ये-जा करावी लागत आहे. वापरत नसलेल्या मार्गाचा वापर वाहन शिकणे, जॉगिंग व चालणे, स्केटींग सरावासाठी केला जात आहे. तसेच, मद्यपी व प्रेमीयुगलाचा तो अड्डा झाला होता.

मार्गात अडथळा ठरणाऱ्या उद्योगांचे स्थलांतर करण्यासाठी एमआयडीसीच्या केएसबी चौकातील डी टू ब्लॉक येथील जागा देण्यात आली आहे. त्यासाठी ७ कोटी रूपये महापालिकेने एमआयडीसीला दिले आहेत. बांधकाम परवानगी घेतल्यानंतर ९ महिन्यांत उद्योजक बांधकाम पूर्ण करणार आहेत. त्यानंतर ते महापालिकेस जागा हस्तांतरण करणार आहेत. ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्याने युरो सिटी व इंड्रोलिक इंडस्ट्रियलची इमारत पाडण्यास सुरूवात करण्यात आली आहे. पाडकाम झाल्यानंतर लवकर रस्ता बनवून बीआरटीचे बॅरिकेट्स उभारले जातील. त्यास किमान ३ महिन्यांचा कालावधी लागणार आहे.



### लवकरच रस्त्यांचे काम सुरु करणार

» बीआरटीएस मार्गास ऑटो क्लस्टर समोरील दोन कंपन्यांच्या इमारतींचा अडथळा होता. त्या कंपन्यांचे एमआयडीसी,भोसरी येथील डी टू ब्लॉक येथे स्थलांतर करण्यात आले आहे. त्यामुळे जुन्या इमारती पाडण्यास सुरूवात केली आहे. बीआरटीचा मार्ग तयार करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात येत आहे.निवडणूक आचारसंहिता उठल्यानंतर तीन कोटी खर्चाची निविदा प्रसिद्ध केली जाईल. उर्वरित कामास किमान ३ महिने लागतील. त्यानंतर एकसलग बीआरटी मार्ग सुरू होईल, असे महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

### बीआरटी मार्गाची सद्यस्थिती

» काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता अंतर ११ किलोमीटर
» अडथळा ठरणाऱ्या कंपन्यांना २०१७ ला महापालिकेची नोटीस
» स्थलांतरासाठी महापालिकेकडून ७ कोटींचा एमआयडीसीला निधी
» केएसबी चौकातील डी टू ब्लॉक येथील जागेत उद्योगांसाठी बांधकाम करण्यास सुरूवात
» अडथळा ठरणाऱ्या दोन इमारती पाडण्यास सुरूवात
» नवीन कामासाठी ३ कोटींचा खर्च अपेक्षित

# शहरातील 13 टेकड्यांची सुरक्षा वाढणार

## तत्कालीन गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी तयार केला सर्वंकष अहवाल

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातल्या टेकड्यांवर फिरायला जाणाऱ्या लोकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. लूटमार आणि बलात्कारासारखे गुन्हे अनेकदा घडत आहेत. त्यामुळे तत्कालीन गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी टेकड्यांच्या सुरक्षेसाठी प्लान तयार केला आहे.

पुण्यातल्या टेकड्यांवर फिरायला जाणाऱ्या लोकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. लूटमार आणि बलात्कारासारखे गुन्हे अनेकदा घडत आहेत. त्यामुळे तत्कालीन गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी टेकड्यांच्या सुरक्षेसाठी प्लान तयार केला आहे. याअंतर्गत १३ पेक्षा अधिक टेकड्या आणि सात पेक्षा अधिक ब्लॅक स्पॉट निश्चित करण्यात आले आहेत.

याठिकाणी सीसीटीव्ही आणि प्रकाशझोताच्या (फ्लड लाइट्स) माध्यमातून या जागांची सुरक्षा वाढविली जाणार आहे. पुणे शहरातील सात पोलीस ठाण्यांच्या उद्घाटन कार्यक्रमावेळी तत्कालीन गृहमंत्री फडणवीस यांनी शहरातील टेकड्या आणि अन्य ब्लॅक स्पॉट सुरक्षित करण्यासाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र निधी देण्याचे जाहीर केले होते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील तेरापेक्षा अधिक टेकड्या आणि सातपेक्षा अधिक ब्लॅक स्पॉट शोधण्यात आले. याठिकाणी करावयाच्या उपाययोजनांसंबंधी सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. हा अहवाल येत्या सोमवारी (२ डिसेंबर) राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.



### ‘टू वे पीए सिस्टीम’

» टेकडीच्या भागांमध्ये ‘टू वे पीए सिस्टीम’देखील ·(माईक आणि स्पिकर) लावले जाणार आहेत. रात्रीच्या वेळी स्पष्ट दिसावे म्हणून १७७ पेक्षा अधिक प्रखर प्रकाशझोत (फ्लड लाइट्स) लावले जाणार आहेत. सिटी सर्व्हेलान्सचे बेस्ट फिचर्स यात समाविष्ट करण्यात आले आहेत. कमीत कमी वेळेत पोलीस घटनास्थळी पोहोचावे, यासाठी सात विशेष मोबाईल सर्व्हेलान्स व्हेईकलदेखील तैनात करण्यात येणार आहेत. पोलिसांच्या या सातही वाहनांमध्ये ड्रोन कॅमेरे असणार आहे. त्यासाठी अंदाजे ७० कोटी रुपये खर्च येणार असून, चार वर्षांच्या देखभाल दुरूस्तीचादेखील समावेश असणार आहे. ज्या ठिकाणी रेंज नाही, आशा त्याठिकाणी ‘रेडिओ फ्रिक्वेन्सी’द्वारे कनेक्टिव्हिटी दिली जाणार आहे.

### आयपी बेस्ड कॅमेऱ्यांची नजर

» टेकड्या आणि ब्लॅक स्पॉट असलेल्या ठिकाणांवर जवळपास ६०० अत्याधुनिक कॅमेरे बसवले जाणार आहेत. पीटीझेड कॅमेरे, फिक्स कॅमेरे आणि एएनपीआर कॅमेऱ्यांसह आयपी बेस्ड कॅमेऱ्यांचादेखील यामध्ये समावेश करण्यात येणार आहे. आयपी बेस्ड कॅमेऱ्यांमध्ये सराईत गुन्हेगारांचे चेहरे कैद होणार असून ‘फेस रिडींग’ सिस्टीमद्वारे गुन्हेगारांची ओळख पटविली जाणार आहे.

### पॅनिक बटनची सुविधा

» ‘ब्लॅक स्पॉट’वर कॅमेऱ्यांसह ‘पॅनिक बटन’ असणार आहे. पॅनिक बटन दाबताच थेट पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला (कंट्रोल रूम) अलर्ट मिळणार आहे. पॅनिक बटणवर असलेल्या कॅमेऱ्यामुळे व्हिडिओ चित्रीकरणदेखील दिसण्यास सुरूवात होईल. बटण दाबण्याच्या एक मिनिट आधीचा आणि नंतरचा व्हिडिओ कॅमेऱ्याद्वारे चित्रीत होईल. बटण दाबताच त्या परिसरातील अन्य कॅमेरेदेखील अलर्ट मोडवर जातील. पोलिसांच्या गस्त घालणाऱ्या वाहनातही अलार्म वाजेल. जेणेकरून गस्तीवरील पोलिसांना संबंधित ठिकाणी पोहोचण्यास मदत मिळेल.

# दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना समन्स; कॉपीराइट कायद्यानुसार जिल्हा व सत्र न्यायालयात दावा

## देशाला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे मल्ल खाशाबा जाधव यांच्यावरील चित्रपटाच्या कथेचा वाद

**पुणे | प्रतिनिधी**

देशाला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे मल्ल खाशाबा जाधव यांच्यावरील चित्रपटाच्या कथेबाबत कॉपीराइट कायद्यानुसार दाखल केलेल्या दाव्यात दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी समन्स बजाविण्यात आले आहे.

खाशाबा चित्रपटाची मूळ कथा लेखक संजय दुधाणे यांची असताना मंजुळे यांनी खाशाबा जाधव यांचे पुत्र रणजित जाधव यांच्याशी बेकायदेशीर करार केल्याचा आक्षेप सदर याचिकेद्वारे घेण्यात आला आहे. याप्रकरणी दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्यासह जिओ स्टुडियो, आटपाट प्रॉडक्शन, निर्माती ज्योती देशपांडे यांच्या विरोधात जिल्हा व सत्र न्यायालयात दावा दाखल करण्यात आला आहे.

खाशाबा जाधव यांच्या चरित्र पुस्तकाचे हक्क असलेल्या संजय दुधाणे यांनी हा दावा दाखल केला आहे. चित्रपटाची निर्मिती आणि प्रदर्शनासाठी बंद आणावी, अशी मागणी करणारा दावा दुधाणे यांनी अ‍ॅड. रवींद्र शिंदे तसेच अ‍ॅड. सुवर्णा शिंदे यांच्यामार्फत जिल्हा व सत्र न्यायालयात दावा दाखल केला आहे. दाव्याची दखल घेत न्यायालयाने मंजुळे, निर्माती ज्योती देशपांडे, जिओ स्टुडियो व आटपाट प्रॉडक्शन यांना आपली बाजू मांडण्यासाठी हजर राहण्याबाबत समन्स पाठविले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ डिसेंबरला होणार आहे.

संजय दुधाणे यांनी दावा दाखल केल्यानंतर मंजुळे यांची बाजू मांडणाऱ्या अ‍ॅड. केदार धोंगडे, अ‍ॅड. शिवम निंबाळकर यांनी या प्रकरणावर बोलणे टाळले. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून त्यावर काही बोलता येणार नाही, अशी त्यांनी प्रतिक्रिया दिली. दुसरीकडे नागराज यांच्याशी फोनद्वारे संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.






### पुस्तकाला मिळालाय सर्वोत्कृष्ट क्रीडा पुस्तकाचा पुरस्कार

» संजय दुधाणे लिखित ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव हे खाशाबांवरील पहिलेच आणि एकमेव पुस्तक आहे. या पुस्तकाची विक्रमी १५ वी आवृत्ती प्रकाशित झाली असून, या पुस्तकाला २००८ मध्ये सर्वोत्कृष्ट क्रीडा पुस्तकाचा राज्य पुरस्कारही मिळाला आहे. २००४ मध्ये नववी आणि २०१५ मध्ये सहावीच्या पाठ्यपुस्तकात या पुस्तकातील पाठ समाविष्ट करण्यात आला आहे.

### काय आहे वाद?

» खाशाबा चित्रपटाची मूळ कथा संजय दुधाणे यांची असल्याचा दावा केला जात आहे. नागराज मंजुळे यांनी रणजित जाधव यांच्याशी बेकायदेशीर करार केल्याचे दुधाणे यांचे म्हणणे आहे. २०१९ मध्ये मंजुळे यांनी चित्रपटाबाबत रणजित जाधव यांच्याशी करार केला होता. मूळात रणजित जाधव यांनीच ३० ऑगस्ट २०१३ रोजी कराड येथे पत्रकार परिषद घेऊन खाशाबांच्या चित्रपटाची कथा ही माझी असल्याचे घोषित केले होते. आता जाधव यांनी आपल्याला डावलून संमती करार केल्याचा आक्षेप दुधाणे यांनी नोंदवला आहे. चर्चेतून सकारात्मक प्रतिसाद न आल्याने मी नागराज मंजुळे यांना नोटीस पाठवली होती, असे त्यांनी दाव्यात नमूद केले आहे.